निलंबन कालावधीचा निर्णय घेणे बाबत ..
श्री.रविंद्र प्रकाश कुलकर्णी, तत्कालीन कनिष्ठ
सहाय्यक (लिपीक), पंचायत समिती अकोले

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-१/आस्था-३/२४३०१७१/२२८/२०२६
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:- १. इकडील निलंबन आदेश पंचायत समिती अकोले (कॅम्प)/आस्था-१/१४४८/२०१९ दिनांक २१/११/२०१९
२. इकडील दोषारोप पत्र क्रमांक साप्रवि-१/आस्था-३/६०९/२० दि २५/०६/२०२०
३. श्री. कुलकर्णी आर पी, कनि सहा, यांचा खुलासा दिनांक ०४/०८/२०२०
४. इकडील आदेश क्रमांक साप्रवि/आस्था-३/९५०/२०२० दिनांक ०८/०९/२०२०
५. इकडील पुनस्थापित आदेश क्र साप्रवि/आस्था-३/१०३८/२० दि १८/०९/२०२०
६. सहाय्यक आयुक्त(चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र. विशा-४/खाचौ/सी.आर.५६/२०२१ दिनांक २४ जानेवारी २०२२
७. इकडील कारणे दाखवा नोटीस क्र.साप्रवि-१/आस्था-३/४५२०/२३१/२०२२ दिनांक २१/०३/२०२२
८. गटविकास अधिकारी, पंचायत समिती अकोले, यांचेकडील पत्र जा.क्र.पंसअ/ आस्था-१/वशि/६५८/२०२२ दि १७/०५/२०२२ समवेत श्री. कुलकर्णी रविंद्र प्रकाश, यांचा खुलासा दिनांक २८/०४/२०२२
९. इकडील आदेश क्र साप्रवि/आस्था-३/४५२०/५९७/२०२३ दि ०३/०५/२०२३
१०. इकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस जा.क्र.साप्रवि/आस्था-३/२४३०१७१/ १२५१/२०२५ दिनांक २७/१२/२०२५
११. गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव यांचेकडील पत्र जा.क्र. साप्रवि/आस्था-१/३०६/२०२६ दिनांक २०/०२/२०२६ समवेत श्री कुलकर्णी यांचा खुलासा दिनांक २०/०२/२०२६
१२. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन,बडतर्फी व सेवेतून काढुन टाकणे ह्या काळातील प्रदाने) नियम १९८१ नियम ७२ (७)

श्री. रविंद्र प्रकाश कुलकर्णी, हे पंचायत समिती अकोले, येथे कार्यरत असताना दैनदिन कार्यालयीन कामी स्वत:च्या अधिकारात विनापरवानगीने रजेवर जाणे, कार्यालयीन दैनदिन उपस्थितीचे नोंदवहीमध्ये स्वाक्षरी करुन कार्यालयात गैरहजर राहणे, कार्यालयीन कामकाज विहीत मुदतीत न करणे, कार्यालयीन आवक-जावक बारनिशी गहाळ करुन पोष्टाचे तिकीटांचा अपहार करणे, कार्यालयीन कामी गैरहजर राहून व कार्यालयीन कामकाजात अनियमितता करुन कार्यालयास अडचणीत आणण्याच्या हेतुने कामकाजात हलगर्जीपण करुन गैरवर्तन केल्याने संदर्भ क्र. १ अन्वये श्री कुलकर्णी यांना जिल्हा परिषद सेवेतुन सेवानिलंबित करणेत आलेले होते.

..२

संदर्भ क्र.२ अन्वये श्री.कुलकर्णी यांना ज्ञापन दोषारोप बजविण्यात येऊन खुलासा सादर करणे बाबत कळविणेत आलेले होते. संदर्भ क्र. ३ नुसार श्री.कुलकर्णी यांनी दिनांक ०४/०८/२०२० रोजी खुलासा सादर करुन त्यांचेवर ठेवणेत आलेले दोषारोप अमान्य केल्याने संदर्भ क्र. ४ अन्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली होती. विभागीय चौकशीचे अधीन राहून श्री.कुलकर्णी यांना संदर्भ क्र.५ अन्वये जिल्हा परिषद सेवेत पुन:स्थापित करणेत आले होते.

सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांनी प्रस्तुत प्रकरणी चौकशी पूर्ण करुन चौकशी अहवाल संदर्भ क्र. ६ अन्वये या कार्यालयास सादर केला. सदरच्या चौकशी अहवालामध्ये नमुद केलेनुसार चार आरोपापैकी तीन आरोप सिध्द व एक आरोप अशंत: सिध्द होतो असा निष्कर्ष सादर केला. या कार्यालयाकडील दिनांक २६/०४/२०२१ रोजीच्या आदेशान्वये श्री कुलकर्णी यांना जिल्हा परिषद सेवेतुन सक्तीने सेवा निवृत्त करणेत आले होते. त्यामुळे त्यांचे विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (५) मधील तरतुदीनुसार जिल्हा परिषद सेवेतुन सक्तीने सेवानिवृत्त करणे ही शिक्षा अंतिम का करणेत येवु नये? याबाबत संदर्भ क्र. ७ अन्वये अंतिम कारणे दाखवा नोटीस बजावणेत आली.

श्री.कुलकर्णी यांनी सदर प्रकरणी खुलासा सादर केला. यापुर्वी श्री कुलकर्णी यांचेवर करणेत आलेल्या शिक्षानुसार संदर्भ क्र ७ मधील अंतिम कारणे दाखवा नोटीशीमध्ये नमुद केलेल्या शिक्षेऐवजी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (२) नुसार पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशारितीने एक वर्षांसाठी बंद करणे ही शिक्षा करणेत आलेली आहे.

श्री रविंद्र प्रकाश कुलकर्णी, कनिष्ठ सहाय्यक यांचा दिनांक २६/०४/२०२१ ते दिनांक २०/०९/२०२१ अखेर एकुण १४८ दिवस सेवा निलंबन कालावधीचा निर्णय घेणेची बाब विचाराधीन होती. संदर्भ क्रमांक १० नुसार श्री. कुलकर्णी यांना नोटीस बजावुन खुलासा मागविणेत आला होता. श्री. कुलकर्णी यांचा संदर्भ क्रमांक ११ नुसार खुलासा प्राप्त झालेला आहे. श्री.कुलकर्णी यांनी त्यांचे खुलाशात त्यांचा दिनांक २६/०४/२०२१ ते दिनांक २०/०९/२०२१ अखेर एकुण १४८ दिवस निलंबन कालावधी हा त्यांच्या रजेच्या खाती शिल्लक असलेल्या देय अनुज्ञेय रजेमधुन खर्ची करुन सदर कालावधी हा सेवेच्या सर्व कारणांसाठी नियमित सेवा कालावधी म्हणुन ग्राह्य धरणेत यावा अशी विनंती केलेली आहेविनंती केलेली आहे.

श्री. कुलकर्णी यांना सदर प्रकरणी त्यांची पुढील वेतनवाढ भावी काळातील वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशा रितीने एक वर्षाकरीता रोखुन ठेवण्याची शिक्षा करणेत आलेली असलेने त्यांचे निलंबन समर्थनीय ठरत आहे. त्यामुळे श्री. कुलकर्णी यांचा खुलासा अमान्य करणेत येत आहे. सबब, मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढुन टाकणे ह्या काळातील प्रदाने) नियम १९८१ च्या नियम ७२ पोटनियम ७ च्या तरतुदीस अधिन राहुन श्री रविंद्र प्रकाश कुलकर्णी, कनिष्ठ सहाय्यक, यांचा दिनांक २६/०४/२०२१ ते दिनांक २०/०९/२०२१ अखेर एकुण १४८ कालावधी हा सेवेच्या सर्व प्रयोजनार्थ कामावर व्यतीत न केलेला कालावधी धरण्यात येत आहे.

..३

सदर आदेशाची नोंद श्री.रविंद्र प्रकाश कुलकर्णी, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कोपरगाव यांच्या मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक ......20260416040067...... असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 16-04-2026 17:12:32
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.रविंद्र प्रकाश कुलकर्णी, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कोपरगाव

द्वारा व प्रत :- गट विकास अधिकारी,पंचायत समिती कोपरगाव

२/- सदर आदेश संबंधितास बजावुन बजावलेबाबतची तारखेसह स्वाक्षरीची पोहोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत :- निवडनस्ती.

स्वाक्षरी / ---
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर